# ७ वाढीस पूरक मानसिकता

## तुमच्यातील क्षमता वृद्धिंगत करणे..

CIX714

**उद्दिष्टे :**

(१) 'बुद्धिमत्ता/कौशल्य/क्षमता यांमध्ये प्रशिक्षण, प्रतिसाद आणि सराव यांच्या मदतीने सुधारणा घडते' या विधानाचे स्पष्टीकरण करणे.

(२) 'वाढीस पूरक मानसिकता' (Growth Mindset) ही संज्ञा स्वत:च्या शब्दांत स्पष्ट करणे.

(३) 'संकुचित साचेबद्ध मानसिकता' व 'वाढीस पूरक मानसिकता' यातील फरक ओळखता येणे.

(४) रोजच्या व्यवहारातील दिलेल्या प्रसंगांना 'वाढीस पूरक मानसिकता' या संकल्पनेचे उपयोजन करून रचनात्मक प्रतिसाद देणे.

(५) वाढीस पूरक मानसिकता या संकल्पनेचा आधार घेऊन स्वत:च्या क्षमतांमध्ये सुधारणा घडवण्याच्या दृष्टीने कार्यनियोजनाचा आराखडा (Design) तयार करता येणे.

## १. बुद्धिमत्ता व क्षमता याबद्दल आपणास काय माहीत आहे?

खाली काही विधाने दिली आहेत. यापैकी काही विधाने सत्य असतील तर काही विधाने असत्य असतील. तुम्ही तुमच्या अनुभवाने विधान सत्य आहे की असत्य ते ठरवा.

कृपया लक्षात ठेवा या ठिकाणी कोणतेही विधान बरोबर नाही. येथे विद्यार्थी प्रतिसाद लक्षात घेऊन त्यावर वर्गात चर्चा घडविणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या समजुतींवर आधारित उत्तरे ठरविण्यास मोकळेपणा द्यावा.

- बुद्धिमत्ता आनुवंशिकतेनेच प्राप्त होते.
- वय जसजसे वाढत जाते तसतशी ती वाढतही नाही, कमीही होत नाही.

सत्य | असत्य

- नवनिर्मितीची क्षमता फक्त जन्मत:च प्राप्त होते.
- प्रतिभा मिळवता येत नाही.

सत्य | असत्य

- प्रतिभावान लोक कधीही अयशस्वी होत नाहीत.

सत्य | असत्य

- बाल्यावस्थेत एखादी गोष्ट चांगली करता आली नसेल, तर भविष्यात कधीच चांगली करता येत नाही.

सत्य | असत्य

- प्रतिभावान लोकांना कठीण परिश्रम करावे लागत नाहीत किंवा सुधारणा करण्याची गरज भासत नाही. ते सारे करू शकतात.

सत्य | असत्य

- तुम्हांला एखादी गोष्ट चांगली जमते हा नेहमीच तुमच्या नशिबाचा भाग असतो.

सत्य | असत्य

## कथा वास्तव आहे का काल्पनिक?

(१) शाळेच्या बास्केटबॉल संघामध्ये एका मुलाची निवड झाली नाही कारण त्याचा खेळ त्या दर्जाचा नव्हता. पण हाच मुलगा नंतर आंतरराष्ट्रीय दर्जाचा बास्केटबॉलपटू म्हणून नावारूपास आला.

(२) ज्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारची सर्जनशीलता नाही आणि स्वत:च्या कोणत्याही कल्पनांची भरारी नाही म्हणून नाकारले गेले तीच व्यक्ती पुढे अत्यंत यशस्वी व्यंगचित्रकार म्हणून नावारूपाला आली.

(३) ज्या मुलीचा एक पाय तिने अपघातात गमावला तिने माऊंट एव्हरेस्ट हे शिखर सर केले.

(४) ज्या मुलाला कोणतीही गोष्ट शिकण्याच्या दृष्टीने शिक्षकांनी मूर्ख ठरविले होते तोच पुढे जाऊन खूप मोठा शास्त्रज्ञ झाला.

**चर्चा करा :**

- या लोकांनी त्यांच्या आयुष्यात जे काही केले ते कसे मिळवले असेल असे तुम्हाला वाटते?
- आपण स्थिर बुद्धिमत्ता किंवा कौशल्य घेऊन जन्माला येतो का?
- एखाद्याची बुद्धिमत्ता किंवा क्षमता कौशल्य कोणत्याही वयाला वृद्धिंगत करणे शक्य आहे का? कसे?
- कोणत्याही वयाला कोणी काही नवीन शिकू शकते का?

हो, या खऱ्या कथा आहेत! या गोष्टींमधील व्यक्ती –




**१. मायकेल जॉर्डन**
जगातील सर्वात महान बास्केटबॉलपटूंपैकी एक



**२. वॉल्ट डिस्ने**
मिकी माऊस आणि डोनाल्ड डक यांची निर्मिती करणारा



**३. अरुणिमा सिंन्हा**
एक अशी स्त्री जिने माऊंट एव्हरेस्ट हे शिखर सर केले आणि युरोप व आफ्रिकेतील सर्वात उंच शिखरे कृत्रिम पायाच्या साहाय्याने सर केली.



**४. थॉमस एडिसन**
नुसत्या विजेच्या दिव्याचा शोध लावून थांबले नाही तर त्यांनी पुढे अनेक शोध लावले. त्यांच्याकडे १००० पेटंटस् होती.



## २. कोणतीही नवीन गोष्ट आपण कशी शिकतो?

सर्व महत्त्वाच्या जीवन प्रक्रियांमध्ये मानवी मेंदू समन्वयक असतो. शरीराच्या सर्व अवयवांकडे संदेश पाठवण्याची जबाबदारी मेंदूची असते. त्याचप्रमाणे अवयवांकडून प्रतिसादात्मक येणाऱ्या संदेशांची स्वीकृती हे सुद्धा मेंदूचे कार्य असते.

सर्व प्रकारचे अध्ययन करण्याची जबाबदारीसुद्धा मेंदूची आहे. नवनवीन गोष्टींचे अध्ययन करणे हे मेंदूमुळेच शक्य होते. नवीन गोष्टींची अध्ययन प्रक्रिया मेंदूमध्ये कशी घडते हे आपण आता समजून घेऊ या.

## वाचा आणि समजावून घ्या :



### चेतापेशी :


- आपली चेतासंस्था ही असंख्य चेतापेशींनी बनलेली असते. मेंदू व आपल्या संपूर्ण शरीरभर या चेतापेशींचे जाळे पसरलेले असते.
- आपल्याला जेव्हा कुठल्याही संवेदना होतात, त्यावेळी या चेतापेशींमधून विद्युतलहरी वाहतात. एका चेतापेशीकडून दुसऱ्या चेतापर्शींपर्यंत या विद्युतलहरी काही रसायनांच्या माध्यमातून पाठवल्या जातात.




- अध्ययन म्हणजे या चेतापेशींमधून विद्युतलहरी जाऊन त्यांच्यामध्ये जोडणी तयार होणे.

### चेतापेशींची जोडणी –

### Synapse - दोन चेतापेशींमधील जागा :



- कुठल्याही दोन चेतापेशी या एकमेकांशी प्रत्यक्ष जोडलेल्या नसतात तर त्यांच्यामध्ये जागा असते. त्या जागेला Synapse म्हणतात.
- विद्युत लहरींचे या जागेतून वहन झाल्याशिवाय आपल्या कुठल्याच कृती, संवेदना, अध्ययन होऊ शकत नाही.




- डोंगरावर ज्याप्रमाणे माती, गवत असते आणि माणसे, प्राणी जाऊन-जाऊन पायवाटा तयार होतात त्याप्रमाणे चेतापेशी आपल्या मेंदूमध्ये आणि शरीरभर असून त्यातून विद्युतलहरी रसायनांच्या माध्यमातून वाहिल्या की त्या पेशींमध्ये जोडणी तयार होते. मेंदूमध्ये पेशींच्या पायवाटा तयार होतात.



- पायवाटा तयार होताना सुरुवातीचा प्रवास जसा थोडा जिकिरीचा असतो तसेच नवीन गोष्टी शिकताना आपल्याला धडपड करावी लागते व नंतर सरावाने या मेंदूमधील पायवाटा उत्तम तयार होतात व त्याला आपण 'अध्ययन' झाले असे म्हणतो आणि एकदा अध्ययन झाले की सरावाने आपल्याला त्याचे कौशल्य प्राप्त होते.

## ३) मेंदू संशोधन काय सिद्ध करते?




### संशोधन 1 :

कविता लिहिणे, गणिते सोडवणे, खेळ खेळणे, वाद्य वाजवणे इत्यादी वारंवार केले तर त्याच-त्याच चेतापेशींमधून विद्युतलहरी जातात आणि त्यांच्यामध्ये भक्कम जोडण्या तयार होतात.


**ताप्तर्य - सरावाने आपल्याला अनेक नवीन गोष्टी व कौशल्ये आत्मसात करता येतात.**

### संशोधन 2 :

या संशोधनात एका पिंजऱ्यात फक्त अन्न-पाणी ठेवले होते व दुसऱ्या एका पिंजऱ्यामध्ये अन्नपाण्याव्यतिरिक्त वेगवेगळी कोडी, खेळणी, काही कसरतीची साधने ठेवली होती. दोन्ही पिंजऱ्यामध्ये उंदरांना ठेवून वाढवले गेले. दुसऱ्या पद्धतीच्या पिंजऱ्यातील उंदरांमध्ये चेतापेशींच्या अधिक जोडण्या झालेल्या दिसून आल्या. हे वयाने जास्त असलेल्या उंदरांमध्ये देखील दिसून आले.



पिंजरा क्र. १



पिंजरा क्र. २

**ताप्तर्य - नवीन आव्हाने स्वीकारण्यास आपण तयार असलो तर वयाच्या कुठल्याही टप्प्यावर आपल्याला नवीन गोष्टी शिकणे शक्य असते.**



***विचारात घेण्याचे मुद्दे :***

*आपला मेंदू आपल्या स्नायूंप्रमाणे असतो. व्यायाम करून आपण स्नायूंना बळकट करतो त्याचप्रमाणे आव्हानात्मक कामे करण्याने, सातत्याने प्रशिक्षण घेण्याने, सराव करण्याने व प्रतिसादात्मक सुधारणा करण्याने आपला मेंदू सुदृढ बनतो.*

तुम्ही कधी व्यायाम केला आहे का? पळणे, वजन उचलणे, झाडावर चढणे, खेळ खेळणे इत्यादी.

तुम्ही व्यायाम करता तेव्हा काय घडते? पहिल्यांदा खूप अवघड वाटते का? तुमच्या स्नायूंमध्ये वेदना होतात का? तुम्हांला ते दुखणे जाणवते का?


कालांतराने वेदना कमी होऊन तुम्हांला बलवान झाल्यासारखे वाटते का? पुढच्या वेळी तुम्ही व्यायाम करून बघा. तुम्ही कमी प्रयत्नात व्यायाम करू शकलात का?

जर अंग दुखते म्हणून तुम्ही पहिल्या प्रयत्नातच व्यायाम करणे सोडून दिले असते तर काय झाले असते?

### ४) अध्ययन व सुधारणा यातील अडथळे

**मानसिकता**

पुढे दिलेल्या दोन प्रसंगांची तुलना करा.



**चर्चा करा :**
दोन्ही घटनांमधील पालकांच्या प्रतिक्रियांचे निरीक्षण करा. त्यांच्यात फरक आहे का? असल्यास कोणता? त्यांना बाळ चालायला शिकेल असा विश्वास का वाटला?

बाळ चालायचा प्रयत्न करत आहे, खाली पडते आहे, पुन्हा उठते आहे, पुन्हा चालायचा प्रयत्न करते आहे, पुन्हा खाली पडते आहे. याचीच पुनरावृत्ती होत आहे. याविषयी तुम्ही खालीलपैकी कोणते विधान कराल?

**(१) बाळ चालायला शिकते आहे.**

**(२) बाळाला चालायला जमतच नाही.**




मुलगा गणितातील प्रमेय समजावून घेण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु चाचणीमध्ये त्याला गुण कमी मिळतात, तो परत प्रयत्न करतो परंतु पुन्हा गुण कमी मिळतात. पुढील दोन विधानांपैकी कोणते विधान या प्रसंगाबाबत तुमच्या मनात येते?

**(१) मुलगा गणितातील प्रमेय शिकत आहे.**

**(२) मुलाला गणिताचे प्रमेय जमतच नाही.**

**तुलना करूया.**



**रेवती बुद्धिमान मुलगी आहे म्हणून तिच्या पालकांकडून व शिक्षकांकडून तिचे नेहमीच कौतुक होते.**

- दहावीमध्ये उत्तम गुण मिळवून रेवती चांगल्या महाविद्यालयात गेली.
- तिथे तिला समजले की तिच्यापेक्षा बरेच हुशार विद्यार्थी वर्गात आहेत.
- तिला न्यूनगंडाची भावना झाली. इतर विद्यार्थी आपल्याला हसतील या विचाराने तिने प्रश्न विचारणे बंद केले.
- तिला परीक्षेची भीती वाटायला लागली.
- ज्यांना उत्तम गुण मिळत, त्यांचा तिला मत्सर वाटू लागला.
- जेव्हा तिला परीक्षेत कमी गुण मिळाले तेव्हा तिला नैराश्य आले.



**रीमाला शाळेत नेहमी चांगले गुण मिळतात. परंतु तिचे पालक व शिक्षक नेहमी तिच्या बुद्धिमत्तेपेक्षा तिच्या परिश्रमांचेच कौतुक करतात.**

- शिक्षक, पालकांनी रीमाला मेंदूवरील नवीन संशोधनाची माहिती दिली. जर आपण मेंदूला पुरेसे आव्हान दिले तर कोणीही बुद्धिमान होऊ शकतो.
- इयत्ता ११वीचा अभ्यासक्रम तिला अवघड वाटला.
- परंतु ती हे जाणून होती की प्रशिक्षण, सराव व प्रतिसाद याआधारे ती तिच्या क्षमता वृद्धिंगत करू शकते.
- ती भरपूर प्रश्न विचारत असे, आव्हानात्मक समस्या तिने सोडवल्या आणि साहजिकच ती इयत्ता ११वी उत्तम श्रेणीने उत्तीर्ण झाली.

*विचारात घेण्याचे मुद्दे :*

- *मानसिकता – मानसिकता म्हणजेच व्यक्तीचा दृष्टिकोन किंवा विचार करण्याची पद्धत.*
- *व्यक्तीच्या स्वत:च्या क्षमता, बुद्धिमत्ता, प्रतिभा यांबाबतची साचेबद्ध मानसिकता नेहमीच सुधारणा घडवण्यामध्ये अडथळा ठरते.*
- *बुद्धिमत्ता, क्षमता जन्मत:च प्राप्त होतात व स्थिर असतात हा रेवतीचा असणारा विश्वास (मानसिकता) याला 'संकुचित साचेबद्ध मानसिकता' (Fixed mindset) असे म्हणतात.*
- *बुद्धिमत्ता, क्षमता या कठोर परिश्रम केल्यास कालांतराने बदलतात हा रीमाचा असणारा विश्वास (मानसिकता) यालाच 'वाढीस पूरक मानसिकता' (Growth mindset) म्हणतात.*

**चर्चा करा :**

दिलेली उदाहरणे वर्गात वाचून दाखवा आणि पुढील प्रश्नांवर चर्चा करा.

रीमाच्या मानसिकतेपेक्षा रेवतीची मानसिकता वेगळी कशी होती? रेवतीला परीक्षेची भीती का वाटत होती?

११ वीचा अभ्यासक्रम अवघड वाटत असूनसुद्धा रीमाला परीक्षेची भीती का वाटत नव्हती?

## वाढीस पूरक मानसिकता (Growth mindset)



वाढीस पूरक मानसिकता (Growth mindset) ही संज्ञा स्टॅनफोर्ड विद्यापीठामधील मानसशास्त्राच्या महिला प्राध्यापक कॅरॉल ड्वेक यांनी दिलेली आहे. कॅरॉल यांनी त्यांच्या संशोधनातून सिद्ध केले की जे विद्यार्थी बुद्धिमत्ता/क्षमता या कठोर परिश्रमाअंती कालांतराने बदलतात यावर विश्वास ठेवतात, त्यांच्याकडे अडथळे पार करण्याच्या आणि स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या जास्तीत जास्त संधी असतात.

**खालील तक्त्यामध्ये संकुचित साचेबद्ध मानसिकता व वाढीस पूरक मानसिकता असणाऱ्या व्यक्तींची वैशिष्ट्ये दिली आहेत. फरक समजून घ्या.**

| व्यक्तींची वैशिष्ट्ये | संकुचित साचेबद्ध मानसिकता | वाढीस पूरक मानसिकता |
|---|---|---|
| त्यांच्या धारणा | बुद्धिमत्ता जन्मत:च स्थिर असते. | बुद्धिमत्ता विकसित करता येऊ शकते. |
| धारणेचा परिणाम | सतत बुद्धिमत्तेचे प्रदर्शन करण्याकडे कल राहतो. | सतत अध्ययनाचा ध्यास असतो. |
| आव्हानांकडे बघण्याचा दृष्टिकोन | आव्हाने टाळण्याकडे कल राहतो. | आव्हाने स्वीकारण्यास आवडते. |
| अडथळे आल्यास | करायला घेतलेली गोष्ट सहज सोडून देतात. | चिकाटीने मार्ग काढून पुढे जातात. |
| प्रयत्नांकडे बघण्याचा दृष्टिकोन | प्रयत्न करणे निरर्थक आहे असे मानतात. | प्रयत्न म्हणजे एखाद्या गोष्टीवर प्रभुत्व मिळवण्याचा मार्ग आहे असे मानतात. |
| टीकेकडे बघण्याचा दृष्टिकोन | उपयुक्त परंतु नकारात्मक प्रतिसादांकडे दुर्लक्ष करतात. | टीकेमधून शिकतात. |
| इतरांचे यश पाहून होणारा परिणाम | इतरांना मिळालेले यश पाहून भीती किंवा ईर्षा वाटते. | इतरांच्या यशातून प्रेरणा घेतात, धडे घेतात. |

## ५) वाढीस पूरक मानसिकता अंगीकारणे

असे काही प्रसंग असतात की ज्यामध्ये प्रत्येक व्यक्ती संकुचित साचेबद्ध मानसिकता वापरूनच विचार करते. खाली दिलेली विधाने वाचून तुम्ही शोधा की तुम्ही संकुचित साचेबद्ध मानसिकता वापरून केव्हा विचार करता? तीच विधाने वाढीस पूरक मानसिकतेमध्ये बदला.






**संकुचित साचेबद्ध मानसिकता**

- मला हे खूप छान जमत नाही.
- हे काम मी सर्वात चांगले करते.
- माझा मित्र/मैत्रिण खूपच बुद्धिमान आहे. मी त्याच्यासारखी/तिच्यासारखी होऊ शकत नाही.
- मला आव्हाने आवडत नाहीत.
- मी अयशस्वी होतो/होते तेव्हा मला फारसे चांगले काहीच जमत नाही असे वाटते.
- माझे गणिती डोके नाही आणि ते मला कधी जमणारही नाही.
- मी अयशस्वी झालो/झाले सारे काही संपले.
- मी हुशार आहे असे मला म्हणा.
- समोरच्याला यश मिळाले तर मला भीती वाटते, असुरक्षित वाटते.

**वाढीस पूरक मानसिकता**

- मला हे काम चांगले करता यावे यासाठी मी काय करायला हवे?
- हे काम मी अधिक उत्तम करू शकेन.
- माझा मित्र/मैत्रिण वेगळे काय करतात याचा शोध घेऊन मी स्वत: बदलेन.
- मला स्वत:लाच आव्हाने दिलेली आवडतात.
- मी अयशस्वी होतो/होते तेव्हा मी माझ्या चुकांमधून शिकतो/शिकते.
- मी माझ्या मेंदूला गणिताचे प्रशिक्षण देणार आहे.
- मला यशासाठी पर्यायी मार्गाचा अवलंब केला पाहिजे.
- मी कठोर परिश्रम घेतो/घेते असे मला म्हणा.
- समोरच्याला यश मिळाले तर त्याच्यापासून मी प्रेरणा घेतो/घेते.




**वाढीस पूरक मानसिकता विकसित करण्यासाठी सोप्या पायऱ्या**

१. तुम्ही तुमच्या क्षमता व बुद्धिमत्ता वाढवू शकता यांवर विश्वास ठेवा.

२. परिश्रम घ्या.

३. जेथे गरज असेल तेथे मदत मागा.

४. नेहमी उच्च आव्हाने स्वीकारा.

## आपण शिकलो त्याचे उपयोजन करू.

### १. चर्चा करा.

पुढे काही प्रसंग दिले आहेत. तुमचे गट पाडा आणि त्या प्रसंगांमध्ये व्यक्ती वाढीस पूरक मानसिकता वापरून कशी वागेल याबद्‌दल चर्चा करा.

तुम्ही सांघिक खेळ खेळण्यासाठी अलीकडेच एका नवीन संघात प्रवेश केला आहे. तुम्हांला समजून चुकले आहे की तो खेळ खेळण्याच्या कौशल्यांमध्ये तुम्ही मागे पडता आहात. संघातील इतरांइतके तुम्हांला चांगले खेळता येत नाही.

वर्गामध्ये चाचणी मालिका घेतली गेली आणि प्रत्येक चाचणीत तुम्हांला कमी गुण मिळाले आहेत. त्याचवेळी तुमच्या मित्राला/मैत्रिणीला या चाचण्यांमध्ये सातत्याने चांगले गुण मिळाले आहेत.

तुम्ही कविता केली आहे आणि तुमच्या मते ती चांगली झाली आहे. जेव्हा तुम्ही ती कविता तुमच्या शिक्षकांना दाखवता तेव्हा शिक्षक त्यातील बऱ्याच त्रुटी तुमच्या निदर्शनास आणून देतात.

तुम्हांला शाळेमध्ये सर्वांसमोर चांगले भाषण करता येते. तुमच्या शिक्षकांनी तुम्हांला आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याचे सुचवले आहे. मात्र अशी शक्यता आहे की या स्पर्धेच्या शेवटी तुम्ही उत्तम ठरालच असे नाही.

तुम्हांला विज्ञान हा विषय अवघड जातो आहे. तुम्ही विज्ञान मनापासून शिकण्यासाठी जास्त वेळ देत आहात. वेळ वाढवूनसुद्‌धा यश मिळत नाही.

### २. मुलाखत



अशी व्यक्ती डोळ्यांसमोर आणा ज्यांच्याकडे सुरुवातीला कौशल्य किंवा क्षमता नव्हत्या पण कालांतराने त्या विकसित झाल्या. मग ती व्यक्ती कोणीही असेल उदा., तुमचे पालक, मित्र, नातेवाईक किंवा एखादी सुप्रसिद्‌ध व्यक्ती. अशा व्यक्तींबद्‌दल जास्तीत जास्त माहिती मिळवण्याचा प्रयत्न करा. मुलाखतीमधून (शक्य झाल्यास) आणि गोळा केलेल्या माहितीच्या आधारे पुढील मुद्‌द्यांची उत्तरे देणारा अहवाल सादर करा.

- त्याने/तिने कोणत्या प्रसंगांमध्ये जास्तीत जास्त संघर्ष केला आहे?
- त्याच्या/तिच्या समोरची कोणती आव्हाने त्यांनी पेलली?

### ३. तुमच्या सर्वात जवळच्या मित्राला/मैत्रिणीला पत्र लिहा.

तुमच्यामधील कमतरता असणारे एखादे क्षेत्र शोधा ज्यामध्ये तुम्हांला वाटते की तुमचे उत्तम प्रकारे सादरीकरण होत नाही आणि त्यासाठी तुम्हांला सुधारणा करण्याची गरज आहे. त्यासाठी एक कृती नियोजन आराखडा तयार करा. (उदा. तुमचे अभ्यासाचे/सरावाचे वेळापत्रक)



तुमच्या जवळच्या मित्राला/मैत्रिणीला तुमच्या सुधारणेसाठी केलेल्या कृती नियोजन आराखड्याची माहिती पत्राद्‌वारे कळवा व तुम्ही त्याद्‌वारे तुमची वाढीस पूरक मानसिकता कशी तयार करता आहात ते वहीत लिहा.

## मूल्यमापन

| भारांश १०% | | | | |
|---|---|---|---|---|
| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
| उपक्रमांमधील सहभाग | सर्व स्वाध्याय/नियमित कामे कार्यशील राहून सहभागाने पूर्ण केले. प्रकरणांमधील व पुस्तकातील सर्व कृती पूर्ण केल्या. | सर्व कृती पूर्ण केल्या. | दुसऱ्यांची बघून उत्तरे लिहिली. | |
| जे शिकलो त्याचे उपयोजन करूया या मुद्द्यातील माहितीचे उपयोजन | प्रकरणात स्पष्ट केलेल्या संकल्पनांपैकी दोनपेक्षा जास्त संकल्पनांचे उपयोजन केले. | प्रकरणात स्पष्ट केलेल्या संकल्पनांपैकी किमान एका संकल्पनेचे उपयोजन केले. | कोणतीही कृती पूर्ण केली नाही. | |
| सर्वात जवळच्या मित्राला/मैत्रिणीला पत्र लिहा या मुद्द्यातील माहितीचे उपयोजन | प्रकरणात स्पष्ट केलेल्या संकल्पनांपैकी दोन पेक्षा जास्त संकल्पनांचे उपयोजन केले. | प्रकरणात स्पष्ट केलेल्या संकल्पनांपैकी एका संकल्पनेचे उपयोजन केले. | काहीही केले नाही. | |


आज ना आम्हांला करिअरच्या संदर्भात शाळेत विचारण्यात आले. पण नक्की मला कोण व्हायचे आहे याबाबतीत काहीच कळत नाही. तू हे करिअर कसे निवडलेस धैर्यधर?
खूप खूप प्रयत्नांनी आणि खरं सांगायचं तर खूप खूप चुका करून कामधंदा करण्याच्या सर्व पद्धतींचा मी अवलंब केला होता.
मी सगळे करून पाहिले. ऑफिसमध्ये संगणकावर आकडेमोड, विविध वस्तूंची विक्री... जसे : भाजीपाला विकणे, सिनेमाची तिकिटे विकणे... मला सतत असेच वाटायचे की, करिअर म्हणजे फक्त पैसा मिळवणे असते.
मग नंतर माझ्या असे लक्षात आले की, मी त्या तशा कामासाठी बनलेला नव्हतोच. माझ्यामध्ये काहीतरी वेगळेपण होते... मला असे वाटते की, ते असे असावे... तुमच्यामध्ये एक आतला आवाज असतो. तुम्हांला फक्त तो लक्ष देऊन ऐकावा लागतो. तसेच त्याला साद ही दिली पाहिजे.